जनसंपर्क कक्ष
22 MAR 2021 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# होमिओपॅथी संशोधन अधिक प्रभावीपणे मांडणे आवश्यक

## कुलगुरू शिर्के : होमेसाकॉन वैद्यकीय परिषद उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

होमिओपॅथी संशोधनाचे कार्य अधिक प्रभावीपणे मांडणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज एक्स स्टुडंट्स असोसिएशन (होमेसा) आयोजित 'होमेसाकॉन २०२१' परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालय, ताराराणी चौक येथे ही परिषद झाली.

डॉ. शिर्के म्हणाले, वैद्यकीय ज्ञान सतत अपडेट ठेवून संशोधनाशी नाते जोडावे. जगाच्या तुलनेत कोरोनावर अधिक प्रभावीपणे नियंत्रण करण्यासाठी भारत यशस्वी ठरत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील होमिओपॅथीसह सर्वच विभागांचे महत्त्व वाढले आहे. हे नाकारून चालणार नाही. कोरोनामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धनाजी बागल म्हणाले, कोरोना मानवाला व्हर्च्युअल, ई लर्निंग तसेच इंटरॲक्च्युअल जगायला शिकवले आहे. कोरोनावर मात करण्यासाठी होमिओपॅथीसह वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन सुरू आहे.

डॉ. राहुल जोशी, डॉ. संतोष रानडे, प्राचार्य रोझारिओ डिसोझा, डॉ. मनीषा शर्मा, डॉ. पायल परमार यांनी मार्गदर्शन केले.

होमेसा प्रेसिडेंट डॉ. राजकुमार पाटील यांनी स्वागत केले. सचिव राजेश कागले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. हिम्मतसिंह पाटील, डॉ. सुहास पाटील, डॉ. अन्वर गंजेली, डॉ. हर्षवर्धन जगताप, डॉ. शीतल पाटील, डॉ. सुधीर जरे आदी उपस्थित होते. परिषदेला ३००० होमिओपॅथ्स ऑनलाईन उपस्थित होते.




कोल्हापूर : होमेसाकॉन २०२१ परिषदेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. सुनेत्रा शिराळे, डॉ. पृथ्वीराज पेठे, डॉ. राजकुमार पाटील, डॉ. धनाजी बागल, डॉ. राहुल जोशी, डॉ. डिसोझा, डॉ. कागले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 MAR 2021 तरुण भारत

# होमिओपॅथी संशोधनाचे कार्य प्रभावीपणे मांडावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : होमेसाकॉन २०२१ परिषदेचे उद्घाटन



कोल्हापूर : 'होमेसाकॉन २०२१' परिषदेमध्ये बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डावीकडून डॉ. सुनेत्रा शिराळे, डॉ. पृथ्वीराज मेथे, डॉ. राजकुमार पाटील, डॉ. धनाजी बागल, डॉ. राहुल जोशी, डॉ. डिसूझा आदी.

कोल्हापूर

होमिओपॅथी संशोधनाचे कार्य संख्यांच्या स्वरूपात अधिक प्रभावीपणे मांडणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज एक्स स्टुडंट्स असोसिएशनतर्फे (होमेसा) आयोजित 'होमेसाकॉन २०२१' या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. परिषद होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, ताराराणी चौक, येथील सभागृहामध्ये संपन्न झाली.

महाराष्ट्र विज्ञान नाशिकचे होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धनाजी बागल म्हणाले, कोरोनावर मात करण्यासाठी होमिओपॅथिसह वैद्यकिय क्षेत्रात महत्वपूर्ण संशोधन सुरू आहे. होमिओपॅथसनी देखील वैद्यकिय क्षेत्रात होणारे नवनवीन बदल आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा रुग्णांना तत्काळ होण्यासाठी कटिबद्ध व्हावे. छातीरोग तज्ञ डॉ. पृथ्वीराज मेथे यांनी कोरोना बरा झाल्यानंतर उद्भवलेल्या इतर गुंतागुंतीच्या आजाराबद्दलचे औषधोपचार व त्यासाठीचे परिणाम व्यायाम याविषयी माहिती दिली.

डॉ. राहुल जोशी यांनी श्वसन संस्थेच्या इतर आजारावरती होमिओपॅथीची अद्ययावत उपचार पद्धती व श्वासोच्छ्वासाच्या विविध व्यायाम पद्धतीची सविस्तर माहिती दिली. गुंतागुंतीशिवाय कोरोना बरा होण्यासाठी 'फेरम फॉस' या होमिओपॅथी औषधाची उपयुक्तता डॉ. संतोष रानडे यांनी विषद केली.

'नॅशनल कमिशन फॉर होमिओपॅथी'ची रचना, कायदा व उद्दिष्ट्ये यासह त्याचा होमिओपॅथी औषधप्रणालीच्या विकासावर होणारे परिणाम प्राचार्य डॉ. रोझारिओ डिसोझा यांनी विषद केले. दिवसभर चाललेल्या परिषदेत डॉ. मनिषा शर्मा, डॉ. पायल परमार यांचीदेखील व्याख्याने झाली.

होमेसा प्रेसिडेंट डॉ. राजकुमार पाटील यांनी स्वागत केले. सचिव डॉ. सुनेत्रा शिराळे यांनी मार्गदर्शन केले. सचिव डॉ. राजेश कानले यांनी आभार मानले.

परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. हिम्मतसिंह पाटील, डॉ. सुहास पाटील, डॉ. अन्वर गंजेली, डॉ. हर्षवर्धन जगताप, डॉ. शितल पाटील, डॉ. सुधीर जरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. या परिषदेस सुमारे ३००० होमिओपॅथ्स् ऑनलाईन उपस्थित होते.

लोकमत

# होमिओपॅथी संशोधनाचे कार्य प्रभावीपणे मांडा

कोल्हापूर : होमिओपॅथी संशोधनाचे कार्य संख्येच्या स्वरूपात अधिक प्रभावीपणे मांडणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज एक्स स्टुडंट्स असोसिएशनच्यावतीने आयोजित 'होमेसाकॉन २०२१' परिषदेत ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ नाशिकचे अधिष्ठाता डॉ. धनाजी बागल, डॉ. पृथ्वीराज मेथे (सांगली), डॉ. संतोष रानडे (कोल्हापूर), प्राचार्य डॉ. रोझारिओ डिसोझा, डॉ. मनीषा शर्मा (मुंबई), डॉ. पायल परमार (मुंबई) यांनी मार्गदर्शन केले. 'होमेसा'चे प्रेसिडेंट डॉ. राजकुमार पाटील यांनी स्वागत केले. संयोजन सचिव डॉ. सुनेत्रा शिराळे यांनी परिषदेच्या संकल्पनेबाबत माहिती दिली. डॉ. राजेश कागले यांनी आभार मानले. डॉ. हिंमतसिंह पाटील, डॉ. सुहास पाटील, डॉ. अन्वर गंजेली, डॉ. हर्षवर्धन जगताप, डॉ. शीतल पाटील, डॉ. सुधीर जरे, आदींनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

22 MAR 2021

# स्वयंस्फूर्तीने शिवाजी विद्यापीठ झाले पाणीदार

जागतिक **जल दिन** विशेष

कोल्हापूर : वैभव गोंधळी

एका बाजूला पाणी संकटाने सर्वांना ग्रासले असताना शिवाजी विद्यापीठाने तब्बल ३१ कोटी लीटर क्षमतेचे पाणीसाठे तयार करून विद्यापीठास पाण्याच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण केले आहे. विद्यापीठास त्याचा आर्थिक लाभ होण्याबरोबरच येथील जैवविविधता वाढीस लागली. राज्यातील इतर विद्यापीठांसाठी हा प्रकल्प आदर्शवत ठरत आहे. देशपातळीवर जलव्यवस्थापनातील आदर्श म्हणून या प्रकल्पाची दखल घेण्यात येत आहे. देशाचे जलपुरुष राजेंद्रसिंह राणा यांना ही या प्रकल्पाची भुरळ पडली.





### भूजल पातळीत वाढ

शिवाजी विद्यापीठाला ८५३ एकरांचा विस्तीर्ण परिसर लाभला आहे. त्यापैकी १०० एकर परिसरामध्ये ५ फुटांची खोदाई केली तरी पाणी मिळते, तर विद्यापीठाशेजारील राजेंद्र नगर, प्रतिभा नगर, सम्राट नगर, अंबाई डिफेन्स कॉलनी या परिसरांमध्ये बोअरवेल आणि विहिरींच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

### स्वयंपूर्णतेतून समृद्धी

विद्यापीठ कोल्हापूर महानगरपालिकेकडून प्रतिमहा ७ लाख रुपयांचे पाणी खरेदी करत होते. मात्र या पाण्याच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण झाल्याने विद्यापीठाने हे पाणी घेणे बंद केले. त्यामुळे विद्यापीठास आर्थिक लाभ होत आहे. विद्यापीठाने वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारून त्या पाण्यातून विद्यापीठातील उद्याने फुलविली आहेत. सध्या असे २ प्रकल्प कार्यान्वित असून २ प्रकल्पांची उभारणी सुरू आहे.

### दृष्टिक्षेपात पाणीसाठा

(साठवणूक क्षमता लीटरमध्ये)

- भाषा भवनजवळील तलाव : २२.१५ कोटी
- संगीत शास्त्रजवळील तलाव : ५.२० कोटी
- सुतार विहीर : ४ लाख
- क्रीडांगणाशेजारील विहीर : ४ लाख
- केमिस्ट्री डिपार्टमेंटशेजारील विहीर : ३ लाख
- सिंथेटीक ट्रॅकशेजारील विहीर : ५ लाख
- कारखान विहीर : १० लाख
- लिड बॉटेनिकल गार्डन विहीर : १० लाख
- तंत्रज्ञान अधिविभागाशेजारील विहीर : ३ लाख
- रूसा विहीर १ : ५० लाख
- रूसा विहीर २ : १८ लाख
- १० शेततळी : ५५ लाख

**श्रमदानातून स्वावलंबन** : पाण्याच्या बाबतीमध्ये स्वयंपूर्ण करण्यासाठी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण संचालक संघटनेने जेसीबी उपलब्ध केला. एनएसएसच्या स्वयंसेवकांच्या मदतीने ३ शेततळी उभारण्यात आली.

### जैवविविधतेमध्ये वाढ

मुबलक जलसंपदेमुळे झाडांची तसेच विविध वनस्पतींची वाढ योग्य पद्धतीने होत आहे. बारमाही पाण्यामुळे ११५ प्रकारचे पक्षी आढळतात. तर मोरांची संख्या हजारात आहे. परिसरामध्ये विविध प्रकारचे साप, ससे आणि इतर सरपटणाऱ्या प्राण्यांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वेगवेगळ्या कालखंडामध्ये ५४ प्रकारची फुलपाखरे आढळल्याचे पर्यावरणशास्त्र विभागाच्या अभ्यासात समोर आले आहे.

### पावसाचे पाणी मुरविणार



विद्यापीठाने जलस्वयंपूर्ण बनून जलव्यवस्थापनाचा आदर्श पाठ तयार केला आहे. या प्रकल्पाचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून राज्यातील इतर विद्यापीठे असा प्रकल्प राबवण्याचा प्रयत्न करत आहेत. परिसरात पावसाचा प्रत्येक थेंब मुरविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

– डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव तथा जलव्यवस्थापनातील तज्ज्ञ

तरूण भारत

# 'समाजशास्त्र विषयात मानवी समूहाचा अभ्यास'

वार्ताहर
कोलोली

समाजशास्त्र विषय हा समाजातील मानवी समुहाचा अभ्यास करतो. त्यामुळेच विद्यार्थ्यांना संशोधनाची माहिती मिळावी यासाठी सामाजिक संशोधन पद्धती या विषयाचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली (ता. पन्हाळा) येथे समाजशास्त्र अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष कार्यशाळेत ते बोलत होते. सन २०२१ या शैक्षणिक वर्षापासून बी. ए. भाग- ३ सेमिस्टर- ५ अभ्यासपत्रिका क्रमांक -VIII सामाजिक संशोधन पद्धती विभाग-१ व सेमिस्टर- ६ अभ्यासपत्रिका क्रमांक -XLLL सामाजिक संशोधन पद्धती विभाग- २ या विषयाच्या बदललेल्या अभ्यासक्रमावर आयोजित केलेल्या एक दिवसीय महाविद्यालयीन शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले होते.

सचिव शिवाजीराव पाटील, श्रीमती वेदिका चौगुले, डॉ. अजय चौगुले, प्रशासन अधिकारी प्रविण आंबेरकर, पुष्पलता सकटे, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील, डॉ. बी. एन. रावण, एस. एस. कांबळे, डी. एच. नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. शिवाजी सूर्यवंशी, डॉ. सतिश देसाई, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. ममता कानडे, डॉ. पी. आर. निसर्गंध, डॉ. महेंद्रकुमार जाधव, डॉ. अरुण पौडमल, डॉ. उषा पाटील यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक एस. एस. कांबळे यांनी केले. स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील यांनी केले. आभार डी. एच. नाईक यांनी मानले. सूत्रसंचालन डी. बी. इनामदार यांनी केले.

22 MAR 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंच्या विचारांचा भोसले यांच्याकडून जागर

- इतिहास संशोधक डॉ. बी. डी. खणे
- कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले चरित्र व कार्य पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा फुलेंचा सत्यशोधकी विचार राजर्षी शाहूराजांनी स्वीकारला, शाहूराजांच्या काळात त्यांचा पुरोगामी विचार पुढे नेणाऱ्या निवडकांमध्ये कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले यांचा समावेश होतो. त्यांनी शाहूंच्या पुरोगामी विचारांची मशाल संस्थानाबाहेर तेवत ठेवली. कर्मवीर भोसलेंच्या जीवनावरील हा चरित्र ग्रंथ नव्या पिढीसाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. बी. डी. खणे यांनी व्यक्त केला.

प्राचार्य डॉ. विलास पोवार लिखित 'कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले चरित्र व कार्य" चरित्रग्रंथाचे प्रकाशन शाहू स्मारक भवनात झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पाटील होते.

प्राचार्य पाटील म्हणाले, चरित्र लिहिताना पुरावे लागतात. कर्मवीर रावसाहेब भोसले यांच्या चरित्रग्रंथात ते दिसून येतात. महात्मा फुलेंचा सत्यशोधकी विचार त्यांच्या रोमारोमात होता. त्यातून त्यांनी केलेले कार्य हे दीपस्तंभाप्रमाणे असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मराठा महिलांसाठी वसतीगृहाची संकल्पना कर्मवीर भोसले यांनी राबवली. त्याद्वारे सत्यशोधकी विचारांचा वारसा जपत सर्व क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवल्याचे शुभेच्छा संदेशाद्वारे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी स्वागत केले. डॉ. छाया पोवार यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते चंद्रकांत पोतदार, बाबासो चौगले यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. पोवार यांनी आभार मानले.